**ठळक बातम्या**

- महाराष्ट्रात लागू झालेला जमीन सुधारणा कायदा देशाचं भविष्य बदलणारा ठरेल, असं माहिती तंत्रज्ञानमंत्र्यांचं प्रतिपादन
- आर्थिक वर्ष २०२५-२६ मधे भारताचं संरक्षण सामुग्री उत्पादन १ लाख ७८ हजार कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर
- शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात फुटीच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर अरविंद सावंत यांनी घेतली लोकसभा सभापतींची भेट

**आणि**

- गुजरातमधे बडोदा इथं बस अपघातात ६ जणांचा मृत्यू , ३१ जण जखमी

**<><><><><>**

महाराष्ट्रात लागू झालेला जमीन सुधारणा कायदा देशाचं भविष्य बदलणारा ठरेल असं माहिती तंत्रज्ञानमंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. पुण्याजवळ रांजणगाव औद्योगिक वसाहतीत जबील या इलेक्ट्रॉनिक्स उद्योगाच्या विस्तारित सुविधेचं उद्घाटन केल्यानंतर आज ते बोलत होते….

**होल्ड- बाईट- अश्विनी वैष्णव**

इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात महाराष्ट्राच्या कामगिरीचं कौतुक त्यांनी केलं, तसंच एकाच दिवसात सर्व परवानग्या देण्याच्या उद्योगस्नेही धोरणाचीही त्यांनी प्रशंसा केली. कौशल्यविकासाकरता गुंतवणूक कमी पडू दिली जाणार नाही असं आश्वासन देऊन त्यांनी महाराष्ट्रातल्या प्रस्तावित आणि प्रगतीपथावरच्या रेल्वे प्रकल्पांची माहिती दिली. मुंबई -अहमदाबाद बुलेट ट्रेन पाठोपाठ मुंबई ते पुणे प्रवास ४८ मिनिटांवर आणणारा तसंच पुणे ते हैद्राबाद प्रवास ९० मिनिटांवर आणणारा बुलेट ट्रेन प्रकल्प लौकरच सुरु होईल असं त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कार्यक्रमाला उपस्थित होते. मुंबई पुणे हा देशातला सर्वात प्रगत आर्थिक कॉरिडॉर ठरेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. जेएनपीटी आणि वाढवण बंदरांना जोडणारा समर्पित मालवाहतूक लोहमार्ग बांधण्याच्या प्रस्तावाबाबत आपण रेल्वेमंत्र्यांशी बोललो आहोत असं ते म्हणाले.

रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांचं आज एक दिवसाच्या दौऱ्यासाठी पुणे विमानतळावर आगमन झालं.  केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी त्यांचं स्वागत केलं. केंद्र सरकारच्या विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

आजच्या दौऱ्यात रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव पुणे रेल्वे स्थानकावर  पुणे - साईनगर शिर्डी या थेट दैनंदिन रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवणार आहेत. तसेच हडपसर रेल्वे स्थानकाला ते भेट देतील.

<><><><><>

फ्रान्समधे जी सेव्हन परिषदेच्या आजच्या दुसऱ्या दिवशी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी अनेक उच्चस्तरीय बैठकांमध्ये सहभागी होणार आहेत.  अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प  यांच्याबरोबर मोदी यांची द्विपक्षीय चर्चासुद्धा  आज होणार आहे.

विविध क्षेत्रांमध्ये भारत आणि अमेरिकेचे द्विपक्षीय संबध दृढ करण्याबरोबरच दोन्ही देशांशी संबधीत अनेक महत्वाच्या स्थानिक तसंच जागतिक मुद्द्यांवरही यावेळी चर्चा होईल. फेब्रुवारी २०२५ नंतर पहिल्यांदाच दोन्ही नेत्यांची समोरासमोर भेट  होणार आहे.

<><><><><>

आर्थिक वर्ष २०२५-२६ मधे भारताचं संरक्षण उत्पादन १ लाख ७८ हजार कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोचल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशाद्वारे सांगितलं. गेल्या आर्थिक वर्षाच्या तुलनेत यात

साडे पंधरा टक्के वाढ झाली आहे, गेल्यावर्षी हे उत्पादन १ लाख ५४ हजार कोटी इतकं होतं, तर २०२०-२१ मधे ८४ हजार कोटी रुपये इतकं होतं असं राजनाथ सिंह यांनी सांगितलं. २०१३-१४ ला भारताचं संरक्षण उत्पादन ४ हजार ७४६ कोटी रुपये इतकं होतं. त्यामुळे गेल्या बारा वर्षात संरक्षण उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचं ते म्हणाले. संरक्षण उत्पादन विभागाच्या आणि इतर सर्व संबंधितांच्या सामूहिक प्रयत्नांमुळे हे शक्य झालं, नवनवे उपक्रम, खासगी क्षेत्राचा वाढता सहभाग, निर्यात क्षमतेत वाढ यांच्या जोरावर संरक्षण उत्पादन क्षेत्र सातत्यानं प्रगती करत आहे, असं राजनाथ सिंह म्हणाले.

<><><><><>

भारताच्या कृषी उत्पादन निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून भारत दररोज ५ हजार उत्पादनं निर्यात करतो, असं कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाचे अध्यक्ष अभिषेक देव यांनी सांगितलं आहे. भारताची स्पर्धा अमेरिका, ब्राझिल, चीन आणि युरोपियन युनियन अशा तगड्या निर्यातदारांसोबत असूनही भारताने हे साध्य केल्याचं देव म्हणाले. भारताची कृषीमालाची निर्यात गेल्यावर्षी ५३ अब्ज डॉलरपर्यंत पोहोचली असून जगातल्या पहिल्या दहा देशांमधे भारताचा क्रमांक लागतो असं ते म्हणाले. तांदूळ आणि मसाल्याच्या पदार्थांशिवाय भारत आता अननस, द्राक्ष, डाळी या पदार्थांचीही निर्यात करत आहे असंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

भारत आणि थायलंड यांच्यात काल बँकॉक इथं दहावी संरक्षण संवाद बैठक झाली. उत्पादन, संशोधन, नवोन्मेष आणि क्षमता विकास या क्षेत्रात सहकार्य करण्याबाबत दोन्ही देशांनी यावेळी सहमती दर्शवली. भारताकडून संरक्षण विभागाचे सह सचिव सत्यजित मोहंती आणि थायलंडच्या संरक्षण विभागाचे उपसचिव ॲडमिरल नुत्तपोल ड्युवनीच यांनी या बैठकीचं अध्यक्षपद संयुक्तपणे भूषवलं. या

बैठकीत संरक्षण सहकार्याबाबत तसंच इतर प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवर सविस्तर चर्चा झाली. तसंच हिंद-प्रशांत महासागर क्षेत्रात शांतता प्रस्थापित करण्याविषयीही दोन्ही देशांनी व्यापक चर्चा केली.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचं प्रतिनिधित्व करण्याचा दावा करणाऱ्या कुठल्याही बंडखोर गटाला मान्यता देऊ नये, अशी विनंती करणारं पत्र खासदार अरविंद सावंत यांनी लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांना लिहिलं आहे. प्रसार माध्यमांमधल्या वृत्तानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या निवडणूक चिन्हावर निवडून आलेले काही खासदार स्वतंत्र गट म्हणून मान्यता मिळवण्यासाठी किंवा दुसऱ्या पक्षात विलीन होण्यासाठी लोकसभा कार्यालयाशी संपर्क साधत आहेत, असं अरविंद सावंत आपल्या पत्रात म्हणाले आहेत. राजकीय पक्षापासून स्वतंत्र असा कोणताही अधिकार विधिमंडळ पक्षाकडे नसतो. नेतृत्व ठरवणं, व्हीप जारी करणं आणि सभागृहातल्या कामकाजाबाबत निर्देश जारी करणं हे अधिकार फक्त मूळ पक्षाकडेच असतात. त्यामुळे पक्षाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या दाव्याचा कुठलाही प्रस्ताव आल्यास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला आपली बाजू मांडण्याची संधी दिल्याशिवाय कोणतीही अंमलबजावणी करू नये अशी विनंती खासदार अरविंद सावंत यांनी सभापती ओम बिर्ला यांना केली आहे. यासंदर्भात खासदार अनिल देसाई आणि अरविंद सावंत यांनी आज सभापती ओम बिरला यांची भेट घेतली.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातल्या नेत्यांना फोडण्याच्या तथाकथित प्रयत्नांशी भाजपाचा काहीही संबंध नसल्याचं भाजप नेते चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केलं आहे. भाजप आणि त्यांच्या नेत्यांना या वादात ओढण्याचे प्रयत्न अयोग्य

आहेत. उद्धव ठाकरे आपल्या आमदारांना आणि खासदारांना पक्ष सोडून जाण्यापासून रोखण्यात अपयशी ठरले आहेत, असा आरोपही त्यांनी केला.

**<><><><><>**

महाराष्ट्रात राज्याच्या माजी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांना लोकायुक्त पदावर नेमण्यात आलं आहे. ओ पी गुप्ता आणि सुवर्णा केवले हे लोकायुक्त सदस्य असतील. लोकायुक्त नेमणुकीसाठी सक्षम समितीने काल या नेमणुकांना मंजुरी दिली. राज्यशासनानं ६ आयएएस अधिकाऱ्यांच्याही बदल्या केल्या आहेत. सिडकेचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांना धारावी पुनर्वसन प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी नेमण्यात आलं आहे. तर त्यांच्या जागी एमएमआरडीएचे अतिरिक्त महानगर आयुक्त अश्विन मुद्गल यांची नेमणूक झाली आहे. मुद्गल यांच्या जागी मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी जोशी यांची नेमणूक झाली आहे. राज्य औद्योगिक विकास महामंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारासु यांची नेमणूक महसूल आणि वन विभागाचे सचिव म्हणून झाली आहे. त्यांच्या जागी दीपेंद्र सिंह कुशवाह यांची नियुक्ती झाली आहे. मुंबई महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी प्राजक्ता वर्मा यांची नेमणूक झाली आहे.

**<><><><><>**

कोळसा आणि लिग्नाइट गॅसिफिकेश प्रकल्पांवरचा तिसरा रोड शो उद्या मुंबईत होणार आहे. केंद्रीय कोळसा आणि खाणकाम मंत्रालयाने आयोजित केलेल्या या ‘रोड शो’ला केंद्रीय कोळसा आणि खाणकाम मंत्री जी. किशन रेड्डी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहतील. भारताच्या कोळसा गॅसिफिकेशन प्रकल्पात उद्योगांचा सहभाग वाढावा या उद्देशाने कोळसा मंत्रालयाच्या संकल्पनेतला हा रोड शो नवी दिल्ली आणि हैदराबाद नंतर आता मुंबईत होत आहे.

**<><><><><>**

फिफा फुटबॉल विश्वचषक स्पर्धेत आज सकाळी झालेल्या सामन्यात, गतविजेत्या अर्जेंटिनाने अल्जेरियाचा ३-० ने पराभव केला. या सामन्यात लिओनेल मेस्सीने हॅट-ट्रिक साधत इतिहास रचला. मेस्सीने विश्वचषकात सर्वाधिक १६ गोल करत जर्मनीच्या मिरोस्लाव क्लोझच्या विक्रमाची बरोबरी केली. आज सकाळी, अमेरिकेतील बॉस्टन स्टेडियमवर झालेल्या दुसऱ्या सामन्यात 'आय' गटातील नॉर्वेने इराकचा ४-१ ने पराभव केला. काल रात्री, न्यू जर्सीमध्ये फ्रान्सने सेनेगलचा ३-१ ने पराभव केला.

**<><><><><>**

भारत विरुद्ध अफगाणिस्तान एकदिवसीय क्रिकेट मालिकेतला दुसरा सामना आज लखनौ इथं सुरु झाला. अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

गुजरातच्या बडोद्यातल्या कोटंबी स्टेडियम जवळ आज पहाटे झालेल्या अपघातात ६ जणांचा मृत्यू झाला असून ३१ जण जखमी झाले आहेत. जखमींना एसएसजी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. राजस्थानातल्या बासवाडा इथून सुरतला जाणारी भरधाव बस पहाटे रस्त्यात उभ्या असलेल्या एका ट्रकला धडकून हा अपघात झाला.

**//<><><><><>//**